International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 42 November - December - 2025

# शेतकरी उत्पादक कंपन्यांची महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासातील भूमिका

**प्रिती मुरलीधर बैरागी[1], डॉ. आशालता देवराम सोनवणे[2]**

[1]*संशोधक विद्यार्थिनी,*

[2]*संशोधक मार्गदर्शक,*

*संशोधन केंद्र - के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक*

*विद्यापीठ – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे*

*Corresponding Author – प्रिती मुरलीधर बैरागी*

**DOI - 10.5281/zenodo.17987554**

**सारांश:**

*शेतकरी उत्पादक कंपन्यां लघु व सीमांत शेतकऱ्यांना संघटित करून त्यांना उत्पादन प्रक्रिया, साठवणूक, मूल्य साखळी, वित्त पुरवठा, बाजारपेठत प्रवेश आणि नवनवीन तंत्रज्ञान उपलब्ध करून देतात. भारतात जवळपास ८६% शेतकऱ्यांकडे उत्पादन विक्री क्षमतेची मर्यादा आहे. शेतकरी उत्पादक कंपनी अशा शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवण्याचे सर्वात प्रभावी साधन मानले जाते. या संशोधनात भारत महाराष्ट्र आणि नाशिक जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या संरचनात्मक रचना, आर्थिक योगदान, शेतकऱ्यांचे उत्पन्न, रोजगार, बाजारपेठ प्रवेश, सरकारी योजनांचा परिणाम आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या अडचणी यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. दुय्यम माहितीचे तक्ते विश्लेषण नकाशे यांचा समावेश करून शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण भूमिकेचे मूल्यांकन केले आहे.*

***कीवर्डस्: शेतकरी उत्पादक कंपन्या, भारतीय कृषी, आर्थिक विकास, महाराष्ट्र कृषी, नाशिक शेतकरी उत्पादक कंपन्या, मूल्य साखळी, ग्रामीण विकास, बाजार संबंध, कृषी वित्त.***

**प्रस्तावना:**

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचा जीडीपी मध्ये १५ ते १८ टक्क्यांनी वाढ झाली. रोजगारात ४५% आणि ग्रामीण लोकसंख्येच्या उपजीविकेत ६० टक्क्यांपेक्षा अधिक वाढ झाली आहे. भारतातील कृषी उत्पादन जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये एक आहे. परंतु लघु शेतकरी व्यवस्थेमुळे अनेक मर्यादा निर्माण होतात कमी उत्पादन अविकसित बाजारपेठ, मध्यस्थांचे जाळे आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार आणि वित्त पुरवठा यावर मर्यादा येतात. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे शेती अल्प प्रमाणात आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी सामूहिक स्वरूपात संघटित होणे आवश्यक आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये शेतकरी हेच कंपनीचे शेअर होल्डर्स असतात आणि सर्व निर्णय प्रक्रियेत थेट सहभागी देखील होतात. शेतकरी उत्पादक कंपन्या ही संकल्पना प्रोड्युसर कंपनी कायदा २००२ नुसार भारतात लागू झाली. २०११ नंतर नाबार्ड, एस.एफ.ए.सी, एन.सी.डी.सी, आणि विविध सीएसआर ( कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी ) संस्थांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या स्थापनेला गती दिली

आहे. सध्या भारत सरकारचे लक्ष नवीन १०,००० शेतकरी उत्पादक कंपन्यांची निर्मिती करण्यावर आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांचा भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर, उत्पादनावर, रोजगारावर आणि कृषी मूल्य साखळीवर काय परिणाम होतो याविषयी संशोधनाची गरज आढळून येते.

**भारतातील शेतकरी उत्पादक कंपन्यांची पार्श्वभूमी:**

स्वातंत्र्यानंतर भारताने कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी सहकारी शेतीचे एक धोरण स्वीकारले असून स्पर्धात्मक बाजारपेठेत व्यावसायिक संघटना म्हणून काम करण्यासाठी सहकारी संस्थांना व्यापक स्वातंत्र्याची आवश्यकता आहे. म्हणून शेतकरी उत्पादक कंपन्या या उद्देशाने सुरू झालेली भारतातील पारंपारिक सहकारी संस्थांपेक्षा एक वेगळी संस्था आहे. कारण त्यांना लाभांशाद्वारे नफा वाटण्याची कायदेशीर परवानगी दिली आहे. ते सदस्यांना त्यांच्या उत्पादनासाठी चांगली किंमत देतात. ज्यामुळे शेतकऱ्यांना नफा होतो. शेतकरी उत्पादक कंपन्यांचा उद्देश शेतकऱ्यांची स्पर्धात्मकता वाढवणे आणि त्यांना नवीन बाजारपेठेमध्ये नफा मिळवून देणे हे आहे. भारतातील लघु आणि सीमांत शेतकऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. विशेषता संसाधनांची मर्यादित उपलब्धता, बाजारपेठ आणि तंत्रज्ञान होय.


शेतकरी उत्पादक कंपनी लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना जागतिकीकरण आणि बाजार व्यवस्थेच्या प्रतिकूल परिणामा पासून सक्षम करते. जगभरातील कृषी उत्पादक संघटना कृषी मूल्य साखळीत महत्वपूर्ण भूमिका बजावतात. युरोप अमेरिका व पूर्व आशियातील देशांनी शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे संघटन, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या बाजारपेठेत थेट प्रवेश उत्पादन मूल्यवर्धनात उल्लेखनीय यश मिळवले आहे.

विकसित देशांमधील मॉडेल्स विकसनशील देशांसाठी मार्गदर्शक ठरताना दिसत आहेत. जागतिक स्तरावर उत्पादक संघटना एकत्रितपणे ५०० अब्ज डॉलर्स पेक्षा जास्त उलाढाल करताना दिसतात. यातील बहुतांश योगदान डेअरी, फळे, भाजीपाला, धान्य प्रक्रिया आणि निर्यात बाजारातून दिसून येते.

**FPCs in India**
(As on March 2023)

| Sr. no. | State | Total Count |
|---|---|---|
| 1 | Maharashtra | 8212 |
| 2 | Uttar Pradesh | 3463 |
| 3 | Andhra Pradesh | 1385 |
| 4 | Madhya Pradesh | 1316 |
| 5 | Tamil Nadu | 1234 |
| 6 | Karnataka | 1069 |
| 7 | Odisha | 981 |
| 8 | Bihar | 962 |
| 9 | West Bengal | 891 |
| 10 | Delhi | 863 |
| 11 | Rajasthan | 842 |
| 12 | Meghalaya | 836 |
| 13 | Gujrat | 602 |
| 14 | Kerala | 407 |
| 15 | Jharkhand | 386 |
| 16 | Chhattisgarh | 242 |
| 17 | Himachal Pradesh | 134 |
| 18 | Jammu & Kashmir | 123 |
| 19 | Punjab | 117 |
| 20 | Uttarakhand | 98 |
| 21 | Goa | 13 |
| 22 | Pondicherry | 05 |
| 23 | Andaman | 02 |

Source: State Sector Report 2023 (NAFPO)




वरील नकाशा प्रमाणे भारतात मार्च २०२३ मध्ये २४,१८३ शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन झालेल्या आहेत. कालांतराने शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये पूर्वीपेक्षा वाढ दिसून येत आहे.

**महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थिती:**

तंत्रज्ञान आणि कृषी तंत्रज्ञाने यांचे एकत्रीकरण झाल्यामुळे शेतकरी उत्पादक कंपन्यांचा विकास मोठ्या प्रमाणावर होतो आहे. शासनाने शेतकरी गट, बाजारभावाची हमी आणि मूल्य साखळी विकासावर भर दिल्यामुळे देशातील शेतकरी उत्पादक कंपन्या आर्थिक विकासात पुढे जाताना दिसत आहेत. सरकार मार्फत शेतकरी उत्पादक कंपन्यांची निर्मिती व बळकटीकरण या धोरणावर लक्ष केंद्रित करून शेतकऱ्यांच्या उत्पादनास योग्य बाजारभाव उपलब्ध करून देणे आणि बाजारभावातील चढउतार टाळून त्यातील जोखीम कमी करण्यासाठी शेतमालाच्या मूल्य साखळ्या बळकट करण्यावर भर दिला गेला.

२०१० पासून जागतिक बँक अर्थ सहाय्यक महाराष्ट्र सौरक्षण विकास प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली शेतकऱ्यांना कंपनीसाठी व्यवसाय करण्यासाठी लागता निर्माण करणाऱ्या राज्याच्या २०२२ च्या यादीनुसार महाराष्ट्र राज्य हे प्रथम क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश द्वितीय क्रमांकावर आहे. आर्थिक वर्ष २०१८ व्यवसाय उभारणीच्या कामगिरी बाबत मध्य प्रदेश हे राज्य उत्तम कामगिरी करणारे असून ते प्रथम क्रमांकावर आहे. महाराष्ट्र दुसऱ्या, उत्तरप्रदेश तिसऱ्या क्रमांक वर आहे. २०२५ पर्यंत महाराष्ट्र राज्यात १४,७८८ शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन झाल्या असून स्टेट ऑफ द सेक्टर च्या अहवालानुसार हे प्रमाण एकूण देशाच्या शेतकरी उत्पादक कंपनीच्या स्थापनेमध्ये ३४% पर्यंत आहे. भारतात मार्च २०२५ पर्यंत एकूण ४३,९२८ शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन झाल्या असून त्यापैकी ६,१०० कंपन्यांनी सुमारे ४००० कोटी रुपयांचे वित्तीय कर्ज वित्तीय पुरवठादार संस्थांकडून घेतले. केंद्रशासनाच्या दहा हजार शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापनेवर बळकटीकरण या योजनेअंतर्गत जून २०२५ पर्यंत १०,०९९ शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन झाल्या आहेत. संपूर्ण देशातील शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना आणि त्यांना मिळालेल्या कर्जावरून असे दिसून येते, की मोठ्या प्रमाणावर शेतकरी कंपन्यापर्यंत वित्तपुरवठा न पोहोचल्यामुळे कर्ज न मिळाल्याने अनेक शेतकरी उत्पादक कंपन्या व्यवसाय सुरू करू शकल्या नाही. याचे मुख्य कारण एफपीसीचे संचालक मंडळातील प्रशासकीय व्यवस्थापन, व्यवसायाची निवड चुकीची, आराखडा नियोजन चुकीचे, गुणवत्ता व दर्जा कमी असणे, उत्तम मार्गदर्शकाचा अभाव हे दिसून येते.

महाराष्ट्र राज्यात एफपीसी व्यवसाय उभारणीस योग्य वातावरण शासकीय यंत्रणांकडून उत्तम सहकार्य वित्त संस्थांकडून सहाय्य मिळाल्याने महाराष्ट्रात आज प्रथम केंद्रबिंदू आहे. देशातील ८१% एफपीसी महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, तामिळनाडू, हरियाणा, ओडिशा, कर्नाटक, पश्चिम बंगाल, राजस्थान या राज्यांमध्ये दिसून येतात.




वरील नकाशात महाराष्ट्रात जून २०२३ मध्ये ९,९६७ एफपीसी स्थापन झाल्यान आहेत. पूर्वी पेक्षा याचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

खालील तक्त्याद्वारे आपणास महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्याची शेतकरी उत्पादक कंपन्यांची संख्या वाढल्याचे आढळून येते.

## FPCs in Maharashtra

(As on 30.06. 2023)

| Sr. No. | District | Total |
|---|---|---|
| 1 | Chh. Sambhajinagar | 782 |
| 2 | Ahmednagar | 739 |
| 3 | Nashik | 721 |
| 4 | Beed | 688 |
| 5 | Jalna | 618 |
| 6 | Pune | 618 |
| 7 | Latur | 538 |
| 8 | Amravati | 451 |
| 9 | Buldhana | 426 |
| 10 | Nanded | 389 |
| 11 | Dharashiv | 362 |
| 12 | Satara | 289 |
| 13 | Jalgaon | 279 |
| 14 | Kolhapur | 256 |
| 15 | Akola | 226 |
| 16 | Solapur | 210 |
| 17 | Bhandara | 206 |
| 18 | Dhule | 201 |
| 19 | Sangli | 201 |
| 20 | Chandrapur | 189 |
| 21 | Hingoli | 189 |
| 22 | Washim | 189 |
| 23 | Parbhani | 177 |
| 24 | Yavatmal | 171 |
| 25 | Wardha | 127 |
| 26 | Nagpur | 121 |
| 27 | Mumbai | 93 |
| 28 | Gondia | 89 |
| 29 | Thane | 89 |
| 30 | Raigad | 81 |
| 31 | Gadchiroli | 67 |
| 32 | Nandurbar | 64 |
| 33 | Sindhudurg | 48 |
| 34 | Ratnagiri | 45 |
| 35 | Palghar | 28 |
| | Total | 9967 |

### राज्यनिहाय शेतकरी उत्पादक कंपन्यांची संख्या ( २०२५ )

| राज्य | एफपीसी संख्या | राज्य | एफपीसी संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १४,४७५ | गोवा | १७ |
| उत्तरप्रदेश | ६,४५८ | हिमाचल प्रदेश | २५१ |
| मध्यप्रदेश | २,२४३ | जम्मू आणि काश्मीर | ३१७ |
| बिहार | १,५८८ | झारखंड | १,९५० |
| पश्चिम बंगाल | १,४९६ | आंध्रप्रदेश | १,४२५ |
| तमिळनाडू | १,४६२ | अंदमान | ९ |
| ओडिशा | २,०१७ | केरळ | ५८४ |

| | | | |
|---|---|---|---|
| राजस्थान | १,२७६ | हैद्राबाद | ९५७ |
| पंजाब व हरियाणा | १,२३० | मेघालय | १,९७५ |
| कर्नाटक | १,४७५ | उत्तराखंड | १७९ |
| छत्तीसगढ | ४४८ | गुजरात | ९१० |
| पोन्डिचेरी | ११ | | |
| दिल्ली | १,१७५ | एकूण | ४३,९२८ |

स्रोत :- ( स्टेट ऑफ द सेक्टर फॉर एफपीओ रिपोर्ट २०२५ )

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक कंपनीची स्थिती अभ्यासणे.

२) शेतकरी उत्पादक कंपन्यांची शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थिती वरील परिणाम मोजणे.

३) शेतकरी उत्पादक कंपन्यांमुळे ग्रामीण रोजगार निर्मितीचे विश्लेषण करणे.

४) बाजारपेठ व्यवस्थापन शेतकऱ्यांना कंपनीच्या भूमिकेचे मूल्यमापन करणे.

५) सरकारी योजना व धोरणांचा प्रभाव अभ्यासणे.

**महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात शेतकरी उत्पादक कंपन्यांची भूमिका:**

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे सामूहिक विक्रीमुळे १० ते ४० % पर्यंत दरवाढ झाली असून इनपुट सामूहिक खरेदीमुळे ८ ते २०% पर्यंत खर्च कमी झाला थेट बाजारपेठेकडे विक्रीसाठी संधी उपलब्ध झाली. ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराची निर्मिती झाली. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला माल गोदामात साठवून ठेवणे त्याचे ग्रेडिंग, सॉर्टिंग, पॅकिंग करणे तसेच ट्रान्सपोर्ट, लॉजिस्टिक्स प्रक्रिया उद्योग करणे याला चालना मिळाली.

महाराष्ट्राचे कृषि जीडीपी मध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांचा अंदाजे ८ ते १०% अप्रत्यक्ष वाटा दिसून येतो. महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक कंपन्या या केवळ एक व्यावसायिक संस्था नसून ग्रामीण भागातील आर्थिक केंद्रबिंदू म्हणून उदयास येत आहेत. लहान व सीमान्त शेतकऱ्यांचे संघटीत प्लॅटफॉर्म म्हणून एफपीसीने शेती क्षेत्रातील अनेक संरचनात्मक समस्यांवर प्रभावीपणे मात करण्यास सुरुवात केली आहे. राज्यातील कृषी उत्पादन, प्रक्रिया, संकलन, वाहतूक, विपणन, निर्यात आणि मूल्यवर्धन या सर्व टप्प्यांवर एफपीसीने आपला ठसा उमटवला आहे.

एफपीसीमुळे शेतकऱ्यांचे एकत्रित सौदेबाजी सामर्थ्य वाढले, ज्यामुळे त्यांना बाजारपेठेत योग्य किंमत मिळू लागली. दलालांची मध्यस्थी कमी झाल्याने शेतीमाल विक्री प्रक्रियेत पारदर्शकता वाढली असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात २० ते ४०% वाढ झाल्याचे विविध अभ्यासातून दिसून येते. सामूहिक खरेदी व्यवस्थेमुळे खत, बियाणे, कीडनाशके, शेती उपकरणे यांचा खर्च लक्षणीयरीत्या कमी झाला. परिणामी, उत्पादन खर्चात बचत होऊन आर्थिक स्थैर्य वाढले. एफपीसी आधारित मूल्यवर्धन व प्रक्रिया उद्योग, जसे ग्रेडिंग, सॉर्टिंग, पॅकिंग, कोल्ड स्टोरेज, कृषि-प्रक्रिया केंद्रे यांनी ग्रामीण भागात रोजगार निर्मितीला गती दिली.

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये एफपीसी हे ग्रामीण सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योगांच्या स्वरूपात उदयास येत आहेत. विशेषतः नाशिक, पुणे, अहिल्यानगर, विदर्भातील अनेक एफपीसी यांनी

स्थानिक पातळीवर १५ ते २०% रोजगार निर्मिती केली असून ग्रामीण स्थलांतर कमी होण्यास मदत झाली आहे. एफपीसीने बाजारपेठेतील थेट संपर्क निर्माण करून मोठ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांपर्यंत शेतकऱ्यांची उत्पादने पोहोचवण्यास मदत केली आहे. सह्याद्री फार्म्ससारख्या आघाडीच्या एफपीसीने दाखवून दिले की संघटीत शेतीमुळे निर्यातक्षमता किती प्रचंड वाढू शकते. भारतातील द्राक्ष, डाळिंब, कांदा, टोमॅटो यांच्या निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा वाढण्यामागे शेतकरी उत्पादक कंपन्यांचे योगदान फार मोठ्या प्रमाणात आहे.

**निष्कर्ष:**

शेतकरी उत्पादक कंपन्यांमुळे कृषी व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण वेगाने पुढे गेले. डिजिटल पेमेंट्स, मोबाईल आधारित कृषी सल्ला, भौगोलिक माहिती प्रणाली आधारित शेती नोंदी, ई-नाम व ई-मार्केटिंगसारख्या आधुनिक साधनांचा वापर वाढला आहे. हे तंत्रज्ञान ग्रामीण भागातील युवकांसाठी नवीन संधी निर्माण करत आहे. महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक कंपन्या या राज्याच्या ग्रामीण आर्थिक विकासाचे मुख्य इंजिन म्हणून काम करत आहेत. त्यांनी केवळ शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवले नाही, तर ग्रामीण भागातील मूल्यसाखळी मजबूत केली, रोजगार निर्मिती केली, कृषी व्यवसायातील नविन उपक्रमांना गती दिली आणि राज्याच्या कृषी जीडीपी मध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. आगामी काळात योग्य धोरणात्मक मदत, तांत्रिक प्रशिक्षण, वित्तपुरवठा, क्लस्टर आधारित विकास आणि निर्याताभिमुख धोरणे मिळाल्यास महाराष्ट्रातील एफपीसी हे देशाच्या संपूर्ण कृषी अर्थव्यवस्थेला नवीन दिशा देऊ शकतात. एफपीसी हा भविष्यातील ग्रामीण आर्थिक विकासाचा आधारस्तंभ ठरू शकतो. शेतमाल निर्यात उत्पादक कंपन्यांचा वाटा सातत्याने वाढताना दिसत आहे.

**संदर्भ :**


1. Anand, S., Ghosh, S., & Mukherjee, A. (2023). Effectiveness of Farmer Producer Organizations at Different Growth Stages in India. Indian Journal of Extension Education, 59 (2), 112-119.
2. Mukherjee, A., Singh, P., & Ray, M. (2020). Enhancing Farmers' Income through Producer Companies in India: Status and Roadmap. Indian Journal of Agricultural Sciences, 90 (4), 627-635.
3. NABARD. (2020). Status of Farmer Producer Organizations in India. Mumbai: NABARD Publications.
4. SFAC. (2021). All India FPO Progress Report 2011-2021. New Delhi: Ministry of Agriculture.
5. Biswas, P., Kumar, A., & Ahmad, N. (2024). Role of FPOs in Revamping Indian Agriculture Landscape. Journal of Scientific Research and Reports, 31(3), 490-506.
6. Government of India. (2023). Agriculture Census 2021-22. Ministry of Agriculture and Farmers Welfare.
7. Sahyadri Farms. (2022). Annual Impact Report. Nashik: Sahyadri FPC.
8. Agrowon. (2024). Condition of Farmer Producer Companies in Maharashtra. Agrowon Weekly.
9. Lokmat Agrowon (2025) Farmer Producer Companies, Agricultural Loans & Farm Product Sales Management.